**महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग**

जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधीत गट क मधील पदे भरण्यासाठी जाहिरात

पदभरती २०२१

संक्षिप्त जाहिरात क्रमांक ०१/२०२१

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाशी संबंधीत गट – क संवर्गातील केवळ नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा www.maharddzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र | पदाचे नांव | दिव्यांग उमेदवारांसाठी एकूण पद संख्या |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक (पुरुष) | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | ०३ |
| ३ | आरोग्य सेवक (महिला) | १३ |

| अ.क्र. | पदाचे नांव | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माता | खुला | --- | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) | खुला | माजी सैनिक | ०२ |
| | | खुला | खेळाडू | ०१ |
| | | खुला | प्रकल्पग्रस्त | ०१ |
| | | खुला | अंशकालीन | ०१ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | खुला | भुकंपग्रस्त | ०१ |

**अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे वेळापत्रक**

| ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ पासून | २१ सप्टेंबर २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजे पर्यंत |

**नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठीच्या** पदभरतीकरिता सविस्तर जाहिरात व जाहीर प्रकटन हे www.maharddzp.com व www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या जाहिरातीव्दारे केवळ दिव्यांग अधिनियम, २०१६ नुसार दिव्यांगांच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गाकरिता तसेच सामाजिक व आथिकदृष्टया (एसईबीसी) मागास प्रवर्ग रद्द झाल्याने, खुल्या प्रवर्गातर्गत नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरिता नव्याने जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

यापुर्वी माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीमधील दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता (OL, BL)(एका पायाने/दोन्ही पायाने दिव्यांग) साठी अर्ज केलेल्या उमेदवारांचे, नव्याने अर्ज मागविण्यात येणार नसल्याने, या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या दिव्यांगांच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गाकरिताच, दिव्यांग उमेदवारांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या जाहिरातीव्दारे एका उमेदवाराला, एकाच जिल्हा परिषदेसाठी अर्ज सादर करता येईल. त्यानुसार उमेदवारांने एकाच जिल्हा परिषदेची निवड करुन, नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे आरक्षणामधील व नव्याने समाविष्ठ समांतर प्रवर्गाचे आरक्षणामधील पदांसाठी अर्ज सादर करावा.

वरील पदांची माहिती , शैक्षणिक अर्हता व अनुभव , कमाल व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रीया शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मागदर्शक सुचना, परिक्षेचे स्वरुप, निवड पध्दत , सर्वसाधारण अटी व शर्ती इ. बाबत अधिक माहितीची सविस्तर जाहिरात www.maharddzp.com व www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलबध आहे. अर्ज करण्यासाठी www.maharddzp.com हे संकेतस्थळ दिनांक 01/09/2021 ते 21/09/2021 अखेर कार्यरत राहील. अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवाराने सविस्तर जाहिरातीमधील व जाहीर प्रकटनातील दिलेल्या सर्व सूचना काळजीपुर्वक वाचून अर्ज सादर करावेत. भरती प्रक्रीया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे , पदाच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ करणे किंवा घट करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती ला राहतील त्या बाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण :- जळगांव

दिनांक :- 26/08/2021.

| सदस्य सचिव, निवड समिती<br>तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जि.प.जळगांव | सदस्य, निवड समिती<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जि.प.जळगांव | अध्यक्ष, जिल्हा निवड समिती<br>जळगांवतथा जिल्हाधिकारी<br>जळगांव |
|---|---|---|

(ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था ८, दि.२० ऑगस्ट, २०२१ चे सहपत्र)

## विवरणपत्र अ

**जळगांव जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधित पदभरतीबाबत जाहीर प्रकटन.**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट–क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च, २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड -१९ साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधीत आरोग्य सेवक , आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवार्गातील माहे मार्च, २०१९ मध्ये दिलेल्या जाहीरातीमधील नमूद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहीरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशील खालील प्रमाणे आहेः-

**<u>अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)</u>**

| अ.क्र | पदाचे नांव | दिव्यांग उमेदवारांसाठी एकूण पद संख्या |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक (पुरुष) | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | ०३ |
| ३ | आरोग्य सेवक (महिला) | १३ |

| अ.क्र. | पदाचे नांव | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माता | खुला | --- | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) | खुला | माजी सैनिक | ०२ |
| | | खुला | खेळाडू | ०१ |
| | | खुला | प्रकल्पग्रस्त | ०१ |
| | | खुला | अंशकालीन | ०१ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | खुला | भुकंपग्रस्त | ०१ |

**१) आरोग्य सेवक (पुरुष) (केवळ नव्याने समाविष्ठ समांतर आरक्षणाचा तपशील )**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिव्यांग नविन प्रवर्ग** | एकूण २२ रिक्त पदांपैकी दिव्यांगासाठी राखीव १ पदे,<br>**a) LV- १** पद<br>दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहेत. | | | | | | | | | | |

**२) आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिव्यांग नविन प्रवर्ग** | एकूण ७२ रिक्त पदांपैकी दिव्यांगासाठी राखीव ०३ पदे,<br>**a) LV-** १ पदे<br>**b) D, HH-** १ पद<br>**c) CP, LC, Dw, AAV - १** पद<br>दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहेत. | | | | | | | | | | |
| **टिप :- यापुर्वीच्या जाहिरातीमधील OL/ एका पायाने या दिव्यांग प्रवर्गाचा समावेश, वरील c) प्रवर्गामध्ये होत आहे.** | | | | | | | | | | | |

**३) आरोग्य सेवक (महिला)**

<table>
<tr><th>प्रवर्ग</th><th>अ.जा.</th><th>अ.ज.</th><th>वि.जा. (अ)</th><th>भ.ज. (ब)</th><th>भ.ज. (क)</th><th>भ.ज. (ड)</th><th>इ.मा. व.</th><th>वि.मा. प्र.</th><th>ई.डब्ल्यु एस.</th><th>खुला</th><th>एकुण पदे</th></tr>
<tr><td>दिव्यांग नविन प्रवर्ग</td><td colspan="11">एकूण ३१५ रिक्त पदांपैकी दिव्यांगासाठी राखीव १३ पदे,<br>a) LV- ४ पदे<br>b) D, HH- ४ पदे<br>c) CP, LC, Dw, AAV - ३ पदे<br>d) SLD, MI व<br>e) MD Involving (a) to (c) above - २ पदे<br>दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहेत.</td></tr>
<tr><td colspan="12">टिप :- यापुर्वीच्या जाहिरातीमधील OL/ एका पायाने या दिव्यांग प्रवर्गाचा समावेश, वरील c) प्रवर्गामध्ये होत आहे.</td></tr>
</table>

माहे मार्च २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालील प्रमाणे सुचना देणेत येत आहेतः-

१. माहे मार्च, २०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.

२. माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य सेवक , आरोग्य सेविका , प्रयोशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरिता आवेदन पत्र/अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिकदुष्टया मागास (SEBC) प्रर्वगातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधित प्रवर्गातून परीक्षेकरीता पात्र राहतील.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये शासकीय नोक-यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.२३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातून (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांने आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीत विकल्प द्यावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापी, ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास(SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने आर्थिकदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्याने परिक्षेपूर्वी सक्षम अधिकाऱ्यांचे आर्थिकदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४. जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्टया